(२)
RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal | ISSN : 2348-7143 March 2019
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 160 : भारतातील सामाजिक व सांस्कृतिक समस्या

# भारतातील शेतकरी आत्महत्या एक भौगोलिक अध्ययन : विशेष संदर्भ मराठवाडा

डॉ.ए.आय. खान
भूगोल विभागप्रमुख
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद
आरगडे अंबादास रोहिदास
संशोधक

किवर्ड : शेतकरी , दुष्काळ , आत्महत्या, मराठवाडा

**१.१ प्रास्ताविक :**

औद्योगिक क्रांतीनंतर भांडवलशाहीच्या कार्याची वस्तुनिष्ठ मांडणी कार्ल मार्क्स यांनी केली तसेच १९ व्या शतकात महात्मा फुले यांनी केली, जी पुन्हा कोणीच केली नाही. ब्रिटिश काळात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले होते. पारतंत्र्याचा काळ असल्याने स्वातंत्र्योत्तर काळात पुन्हा शेतकरी सुखी होईल अशी आशा होती. मात्र स्वातंत्र्योत्तर काळातही शेतीच्या धोरणात फारसे बदल झाले नाही. उलट औद्योगिक विकासाला प्राधान्य देऊन अर्थव्यवस्था सुधारण्याचे प्रयत्न झाले. याचे जसे सुपरिणाम होते, तसेच दुष्परिणाम ही होते. शेतीचे बिघडलेले अर्थकारण, सातत्याचा दुष्काळ, बँकाचे वाढते कर्ज, शेतकऱ्यांच्या मुलाचा शैक्षणिक खर्च यामुळे शेतकरी हवालदिल झाला. अशा नैराश्यग्रस्त भूमिकेतून त्याने आत्महत्येचा मार्ग निवडला. मराठवाडा, महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरात शेतकरी आत्महत्या मोठया प्रमाणात होऊ लागल्या.[१]

**१.२ संशोधनाची उद्दिष्टे :**

१. भारतातील शेतकरी आत्महत्येचा आढावा घेणे.
२. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येचा आढावा घेणे.
३. मराठवाडयातील शेतकरी आत्महत्येचा आढावा घेणे.
४. शेतकरी आत्महत्या थांबण्यासाठी उपाययोजना करणे.

**१.३ संशोधनाची गृहीतके :**

१. भारतात सवाधिक शेतकरी आत्महत्या महाराष्ट्रात झाल्या आहे.
२. मराठवाडयात सातत्याने दुष्काळ असतो.

**१.४ संशोधन पध्दती :**

प्रस्तुत अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षणात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पध्दतींचा आधार घेवून शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**१.५ तथ्य संकलन :**

शोधनिबंधाची वस्तुनिष्ठ आणि शास्त्रीय मांडणी करण्यासाठी विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, पीएच.डी प्रबंध,वर्तमानपत्रे व शासकीय दस्तऐवज इत्यादीचा आधार घेवून शोधनिबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

**१.६ शोधनिबंधाची आवश्यकता :**

भारतासारख्या कृषीप्रधान देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे, भारतात ५८ टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे.[२] तरी सुध्दा आजची व्यवस्था देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी शेतकऱ्याला वगळून ती सुधारणेचा प्रयत्न करतांना दिसते. जगाचा पोशिंदा म्हणून घेणारा शेतकरी स्वत:ला आणि स्वत:च्या कुटुंबाला पोसू शकत नाही व शेवटी गळयाला फास लावतो. ही परिस्थिती शेतकऱ्यावर का ओढवली गेली. याची कारणमीमांसा करण्यासाठी भारतातील शेतकरी आत्महत्या एक भौगोलिक अध्ययन : विशेष संदर्भ मराठवाडा हा विषय निवडला आहे.

**१.७ आत्महत्येची प्रमुख कारणे :**

१) शेतमालाचे अस्थिर दर आणि हमी भावाची प्रतिक्षा.
२) ऊसाची एफ.आर.पी, तूर-हरभरा हमी भावासाठी विलंब.
३) कर्जमाफीची ठप्प झालेली प्रक्रिया आणि बँकांचा ठेंगा.
४) खासगी सावकारांचा चक्रवाढीने व्याजदर.
५) शेतमाल उद्योगांची अपूरी संख्या.
६) कुटुंबाचा खर्च, मुला-मुलीचे लग्न, बेरोजगारी आणि कोलमडलेले शेतीचे अंदाजपत्रक.

**१.८ भारतातील शेतकरी आत्महत्या :**

जागतिक आरोग्य संघटनेने ५ सप्टेंबर २०१४ रोजी प्रसिध्द केलेल्या अहवालात दर ४० सेकंदानी भारतात एक आत्महत्या होत असल्याचे म्हटले होते. हूच्या दक्षिणपूर्व आशिया विभागात हा आत्महत्येचा अंदाजे दर हा हूच्या अन्य विभागाच्या तुलनेत सर्वाधिक आहे. या आत्महत्या करण्यात तरुण आणि वृध्दांची संख्या जास्त आहे. जगात सर्वाधिक आत्महत्या या दक्षिणपूर्व आशिया विभागात (दक्षिण पूर्व आशियातील कमी व मध्यम उत्पन्न असलेल्या देशात ३९%) होतात. भारतातील आत्महत्येचा दर हा दर लाख लोकामागे २१.१ टक्के आहे.अशा प्रकारचा अहवाल हूने प्रथमच प्रसिध्द केला आहे. त्यात जगातील एकूणच आत्महत्या, आत्महत्येचा प्रयत्न आणि आत्महत्येचे यशस्वीपणे रोखलेले व्यापक चित्र आहे. असे हूच्या मेंटल हेल्थ ऑफ सबस्टॅन्स अब्यूज विभागाचे संचालक डॉ. शेखर सक्सेना यानी म्हटले.[३]

नॅशनल क्राईम रेकार्ड ब्युरोच्या ताज्या आकडेवारीतून शेतकरी आत्महत्येचे भीषण वास्तव समोर आले. २०१४ च्या तुलनेत २०१५ मध्ये शेतकरी आत्महत्या घटनांमध्ये तब्बल ४२% वाढ झाली आहे. यातील सर्वाधिक आत्महत्या या महाराष्ट्र राज्यात झाल्या. ताज्या आकडेवारीनुसार २०१४ मध्ये देशात ६,५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. तर २०१५ मध्ये ८ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या



Govt. College of Arts & Science Aurangabad
Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Sci... A'bad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

केली. देशातील अनेक राज्यांना २०१४ आणि २०१५ या दोन वर्षात दुष्काळाचा सामना करावा लागला होता.त्यात महाराष्ट्राचा ही समावेश आहे. या दरम्यान महाराष्ट्रात एकूण ३ हजार ३० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून एकूण आत्महत्येच्या तुलनेत हे प्रमाण ३७.८ टक्के इतके आहे.तर तेलंगणामध्ये १,३५८ कर्नाटकमध्ये १.१९७ शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणा व अन्य कारणामुळे जीवनयात्रा संपवली. महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगढ आणि कर्नाटक या राज्यामध्ये मिळून ९४.१ टक्के आत्महत्या झाल्या होत्या. तर अन्य राज्यात एकही आत्महत्या झाली नाही. यात बिहार पश्चिम बंगाल, गोवा, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, झारखंड, मिझोरम, नागालॅन्ड आणि उत्तराखंड या राज्यामध्ये दोन वर्षात एकही आत्महत्या झाली नाही. मात्र शेतमजूराच्या आत्महत्येत घट होतांना दिसते. २०१४ आणि २०१५ या वर्षात शेतमजुरांच्या आत्महत्येचे प्रमाण ३१.५ टक्क्यांनी कमी झाले आहे. २०१४ मध्ये ६ हजार ७,१० शेतमजुरानी आत्महत्या केली होती, तर २०१५ मध्ये ४,५९५ इतकी खाली आली.[४]

लॅन्सेट मधील शोधनिबंधाच्या नुसार भारतातील महाराष्ट्र, तामिळनाडू व आंधप्रदेश या तुलनेने प्रगत राज्यामध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे. आत्महत्यामुळे होणाऱ्या मृत्यूची संख्या एच.आय.व्ही ने होणाऱ्या मृत्यूच्या संख्येच्या दुप्पट आहे. ग्रामीण व निमशहरी भागामध्ये राहणाऱ्या उच्चशिक्षित वर्गामध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे.तसेच किटकनाशकांच्या प्राशनामुळे आत्महत्या अधिक होतात.[५]

भारतातील शेतकरी आत्महत्या :[६]

तकता क्र १.१


| अ.क्र | वर्ष | आत्महत्या | अ.क्र | वर्ष | आत्महत्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९९५ | १०,७२० | १३ | २००७ | १६६३२ |
| २. | १९९६ | १३७२९ | १४ | २००८ | १६७९६ |
| ३. | १९९७ | १३६२२ | १५ | २००९ | १७३६८ |
| ४. | १९९८ | १६१५२ | १६ | २०१० | १५९६४ |
| ५. | १९९९ | १६०८२ | १७ | २०११ | १४०२७ |
| ६. | २००० | १६६०३ | १८ | २०१२ | १३७५४ |
| ७. | २००१ | १६४१५ | १९ | २०१३ | ११७७२ |
| ८. | २००२ | १७९७१ | २० | २०१४ | १२३६० |
| ९. | २००३ | १७१६४ | २१ | २०१५ | १२६०२ |
| १०. | २००४ | १८२४१ | २२ | २०१६ | -- |
| ११. | २००५ | १७१३१ | २३ | २०१७ | -- |
| १२. | २००६ | १७०६० | २४ | २०१८ | -- |

(Source-"NDA, UPA failed to curb farmer suicides-*".Have India's farm suicides really declined? By P Sainath*"Profile of suicide victims categorized by profession – 2013" (PDF). Archived from the (PDF) on 26 February 2015*. " Farmers commit suicide every day in India: Research".) National Crime Record Bureau Report-1995-2011

शंकुतला पाटील (२०१२) यांनी 'शेती क्षेत्रातील कर्जबाजारीपणा' या संशोधनात्मक लेखात कर्जबाजारीपणा व शेतकऱ्यांच्या आत्महत्या यातील संबंधाचे विश्लेषण केले आहे. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २००५ नुसार भारतात ४८.६% शेतकरी कर्जाच्या सापळ्यात अडकलेले आहेत. शेतकऱ्यांचा कर्जपुरवठा हा प्रामुख्याने सहकारी बँका, ग्रामीण बँका, व्यापारी बँका, सावकार, जमीनदार यांच्याद्वारे होतो. यामध्ये प्रामुख्याने सावकारांकडून अधिक व्याजदराने कर्जपूरवठा होतो. मात्र सावकारांचा, बँकांचा कर्ज परतफेडीसाठी सातत्याने तगादा असतो. या तगाद्याला कटांळून शेतकरी आत्महत्या करतात. एकूण शेतकरी आत्महत्यांपैकी ८०% आत्महत्या या कर्जबाजारीपणामुळे झाल्या.[७] यावरुन कर्जबाजारीपणा हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमुख कारण ठरते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी संस्थात्मक स्त्रोताद्वारे कमी व्याजदराने कर्जपुरवठा केला पाहिजे.तसेच शेती व शेतकरी हा विकासांचा केंद्रबिंदू मानून विकास योजना राबविणे गरजेचे आहे.

भारतातील शेतकरी आत्महत्या –२०१०–२०१५

आलेख क्र १.१



नानासाहेब देशमुख (२०१३) यांनी 'सावकारी संपुष्टात आणणे हा उपाय' या लेखात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे सांगून उपाय सूचविले आहेत. या लेखाद्वारे हे स्पष्ट होते की, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे खरे कारण सावकारांकडून घरे, जमिनी अशा स्थावरांची खरेदीखते केली जाते, शेतकऱ्यांना ते परत मिळत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निराशा वाढून आत्महत्या केल्या जातात. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी सावकारी संपुष्टात आणणे हाच मुख्य उपाय आहे. त्यासाठी हैदराबाद विभागातील १९५६ च्या डेट रिलीफ ॲक्टसारखा कायदा करावा. अशा कायद्यामुळे शेतकऱ्यांचे शोषण थांबेल. आंध्र प्रदेश सरकारने असा कायदा करुन व शेतकऱ्यांना प्रामाणिकपणे अर्थसहाय्य करून त्यांच्याकडील आत्महत्येचा प्रश्न जवळपास सोडवला आहे. महाराष्ट्र सरकारने याचे अनुकरण केले तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यात यश येईल.[८]

मोरेश्वर बडगे (२०१३) यांनी 'घटते आहे शेतकऱ्यांची लोकसंख्या' या लेखात भारतातील शेती व शेतकरी जीवनाचे विश्लेषण केले आहे.त्यांच्या लेखातून हे स्पष्ट होते की, गेल्या दहा वर्षात शेतकऱ्यांची संख्या ७७ लाखांनी घटली आहे. शेती हा आतबट्ट्याचा व्यवसाय झाला आहे.त्यामुळे शेतकरी कमी होत आहेत. हाच कल राहिला तर 'भारत एकेकाळी कृषीप्रधान देश होता' असे म्हणण्याची वेळ येईल. भारतात १९८९ ते १९९१ हे दहा वर्षे सुगीचे दिवस गेले, नंतर मात्र वाईट दिवस सुरु झाले.त्यामुळे गेल्या १८ वर्षात देशातील २ लाख ८४ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.[९] शेतकऱ्यांच्या आत्महत्येस प्रामुख्याने 'कर्ज' हा घटक कारणीभूत ठरला आहे.



Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science A'bad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal
*Impact Factor (SJIF) - 6.261* | *Special Issue 160 :* भारतातील सामाजिक व सांस्कृतिक समस्या
ISSN : 2348-7143
March 2019

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी व शेती व्यवसायाप्रती तरुण वर्गात आवड निर्माण होण्यासाठी शेतीमालाला उत्पादन खर्चाच्या प्रमाणात योग्य भाव देणे गरजेचे आहे.

**१.९ महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येचा आढावा :**

डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांनी २००५ मध्ये विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची भेट घेतली, तेंव्हा त्यांनी स्पष्ट केले की, शेतकऱ्यांच्या आतापर्यंत झालेल्या आत्महत्या व यापूढे होणाऱ्या आत्महत्यांना शासनाची धोरणेच जबाबदार आहेत. त्यामुळे ती बदलली पाहीजे. तसेच राष्ट्रीय कृषी पुरुज्जीवन कार्यक्रमात मृदा संवर्धन, सिंचन क्षेत्रात वृध्दी, पत आणि विमाविषयक सुधारणा, तंत्रज्ञान सुधार, शेतकऱ्यांना मध्यवर्ती माणनारी विपनन व्यवस्था, इत्यादींवर शासनाला लक्ष केंद्रीत करावे लागेल.[१०]

**महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्येचा आढावा :** [११]

**तक्ता क्र.१.२**


| अ.क्र | वर्ष | आत्महत्या | अ.क्र | वर्ष | आत्महत्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९९५ | १२८३ | १३ | २००७ | ४२३८ |
| २. | १९९६ | १९८१ | १४ | २००८ | ३८०२ |
| ३. | १९९७ | १९१७ | १५ | २००९ | २८७२ |
| ४. | १९९८ | २४०९ | १६ | २०१० | ३१४१ |
| ५. | १९९९ | २४२३ | १७ | २०११ | ३३३७ |
| ६. | २००० | ३०२२ | १८ | २०१२ | ३७८६ |
| ७. | २००१ | ३५३६ | १९ | २०१३ | ३१४६ |
| ८. | २००२ | ३६९५ | २० | २०१४ | ४००४ |
| ९. | २००३ | ३८३६ | २१ | २०१५ | ४२९१ |
| १०. | २००४ | ४१४७ | २२ | २०१६ | ३०९१ |
| ११. | २००५ | ३९२६ | २३ | २०१७ | २९१८ |
| १२. | २००६ | ४४५३ | २४ | २०१८ | १४१७ |

(Source-.P.Sainath 2.National Crime Record Bueruo-2016 3.Dainik Sakal -21-11-2018)

सततचा दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणा खासगी सावकारीचा पाश, शेतमालाचे घसरलेले भाव या व अन्य कारणामुळे सध्याच्या सरकारच्या ४ वर्षाच्या काळात महाराष्ट्रात ११ हजार २,४१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, तर आघाडी सरकारच्या १५ वर्षाच्या काळात १७ हजार ७,०३ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली.मदत व पूनर्वसन विभागानी ही आकडेवारी गोळा केली आहे.

**महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या**

**आलेख क्र १.२**



**महाराष्ट्रातील विभागनिहाय शेतकरी आत्महत्येचा आढावा**[१२]


**तक्ता क्र.१.३**

| अ.क्र. | विभागाचे नाव | एकूण आत्महत्या |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद | ३८५१ |
| २ | कोकण | १० |
| ३ | नाशिक | १७२० |
| ४ | पुणे | ३३१ |
| ५ | अमरावती | ४०९७ |
| ६ | नागपूर | १२३२ |
| | एकूण | ११२४१ |

(स्त्रोत – दैनिक मटा , ८–०२–२०१९)

**महाराष्ट्रातील विभागनिहाय शेतकरी आत्महत्येचा**

**आलेख क्र १.३**




**१.१० मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या :**

मराठवाड्यात भीषण दुष्काळाची स्थिती असते. जेमतेम पावसामुळे पिण्याच्या पाण्याबरोबर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न भेडसावत आहे.शेतीला जोड व्यवसाय म्हणून दुध व्यवसायाकडे बघितले जाते, मात्र चाऱ्याचे दर वाढल्याने भविष्यात पशुधन वाचविणे हे शेतकऱ्यांपुढे मोठे आव्हान असेल. मागील (२०१८) वर्षाच्या हंगामात उशिरा पाऊस झाल्याने शेतीतील पेरण्या उशिरा झाल्या होत्या. तसेच बऱ्याच शेतकऱ्यांना दुबार आणि तिबार पेरणीला सामोरे जावे लागते होते. त्यामुळे पीक उत्पादनात घट झाली होती. तर डिसेंबर-जानेवारी अखेर वाहणारे ओढे, नाले, नदीचे पाणी सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यातच आटले. विहिरीची पाणी पातळी घटली. पाण्याच्या कमतरतेमुळे मराठवाड्यातील ओल्या चाऱ्याची समस्या निर्माण होते. परभणी जिल्हयात खरीप हंगामातील नापिकीमुळे शेतकऱ्यांसमोर यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे. सावकारांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड कशी करावी, ही चिंता त्यांना सतावत आहे. जालना जिल्हा दालमिल, वस्त्रोद्योग आणि स्टील कंपनीने नावाजलेला आहे, मात्र सलग तीन वर्षापासूनच्या दुष्काळी संकटांनी या जिल्हयाला संकटाच्या खाईत टाकले. या दुष्काळी परिस्थितीला सामोरे जातांना शेतकऱ्यांचा धीर खचतो. कर्जबाजारीपणा, नापिकी ही मराठवाड्यातील शेतकऱ्यांची प्रमुख समस्या आहे. जिल्हयात ६५ टक्के



Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt College of Art's
PRINCIPAL
Govt. College of Ar...
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

एवढा कमी पाऊस झाला आहे. खरीप हंगामातून केवळ २५ टक्के एवढेच उत्पन्न हाती लागले आहे. तर रब्बी हंगामात तिच अवस्था आहे. बिघडलेल्या ऋतूचक्रामुळे जालन्याची मोसंबीची ओळख पुसून टाकली जात आहे. सततचा दुष्काळ, अतिवृष्टी, बेमोसमी पाऊस व वादळ वाऱ्यांसह गारपीटीने अनेक फळबागा नामशेष झाल्या आहेत. गोदाकाठची जमीन असल्याने व पैठणच्या डाव्या कालव्यामुळे काही भाग सुजलाम सुफलम होता, मात्र दुष्काळामुळे या भागालाही झळा पोहचल्या आहेत. मराठवाडयातील लातूर जिल्हयाला ही दुष्काळाने होरपळले आहे.रानोरानी करपलेली पिके, बेचिराख झालेले शेतकरी, गाव सोडून मजूरीला बाहेर गेलेले युवक, ओसाड गावे असे विदारक चित्र जिल्हयाचे आहे.पावसाअभावी खरीपांचा हंगाम हातचा गेला. सोयाबीनला उतारा नाही. उस वाळून चाललाय, खरबाड आणि मुरमाड राणाचे वाळवंट झाले.काही शेतकऱ्यांच्या काळया जमीनी रब्बीत जोंधळा, हरभरा, गव्हाचे पिक देतात, पण पाऊसच नसल्याने पेरणीच झाली नाही. नांदेड जिल्हयातील शेतकऱ्यांपुढे दुष्काळामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. अत्यल्प पावसामुळे खरीप हंगाम यंदा हातून जात आहे. रबी हंगामात पेरणीसारखी स्थिती नाही. उत्पादनासाठी केलेला खर्च वसूल होत नाही.त्यामुळे वर्षभर शेतकऱ्यांनी जगायच कसं, मुला-मुलींचे शिक्षण, विवाह आणि कर्ज कसे फेडायची या चिंतने शेतकरी हैराण झाला आहे. दुष्काळाच्या गडद छायेत आर्थिक व्यवहार पूर्णपणे मंदावले आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे कुटुंब पार कोलमडून गेले आहे. मराठवाडयातील आवर्षणग्रस्त जिल्हा म्हणजे बीड जिल्हा.. आधीच कमी पाऊस त्यात पुन्हा दुष्काळाचा फेरा, यामुळे जिल्हयातील शेतकरी कर्जाच्या डोंगरासह विविध समस्यांनी ग्रासले आहेत. सततच्या दुष्काळामुळे जिल्हयातील शेतकऱ्यांना शेतीवर अवलंबून न राहता दरवर्षी ऊसतोडीला जावे लागत आहे. प्रकल्पामध्येही पाणीसाठा वाढत नसल्याचे चित्र आहे.यामुळे भूगर्भातील पाण्याचा उपसा वाढला आहे मागील तीन-चार वर्षापासूनच्या सततच्या दुष्काळी स्थितीमुळे व कमी पावसामुळे सातत्याने भूजल पातळी खोल जात आहे. परिणामत: कर्ज घेऊन पेरणी करून शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पादन मिळत नाही. उस्मानाबाद जिल्हयामध्ये काही तालुक्यात दुष्काळ आहे. अवेळी आणि अल्प पावसामुळे खरीप आणि रब्बी हंगाम निघून गेला. पिकांची समाधानकारक न होणारी वाढ व काही पिकांची वाढ झाल्यास रोगाचा प्रादुर्भाव व यामुळे उत्पादनात होणारी घट या कारणाने शेतकऱ्यांची आर्थिक ओढाताण होत आहे. उदरनिर्वाह व पेरणीसाठी कर्ज घेण्याशिवाय पर्याय नाही आणि अशा आर्थिक विवंचनेत सापडलेल्या शेतकऱ्यांना जिल्हा बँकेकडून कर्ज तात्काळ मिळत नाही. पर्यायाने राष्ट्रीयकृत बँकेचे उंबरठे झिझवावे लागतात. तरी बँका कर्ज देत नाही. अशी दयनिय अवस्था उस्मानाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांची झाली आहे.

मराठवाडयातील आठ जिल्हयात २०१८ च्या शेवटपर्यंत केवळ २४४.६९ मिलीमीटर पाऊस झाला होता. अपुऱ्या पावसामुळे मराठवाडयातील बीड, लातूर, उस्मानाबाद आणि परभणी जिल्हयातील स्थिती अत्यंत विकट झालेली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात तर प्रशासनाला दुष्काळी कामे करावी लागणार आहे. खरे तर जून व जुलैमध्ये (२०१८) पावसाला चांगली सुरुवात झाली होती, मात्र पुन्हा नंतर खंड पडला. महिनाभरानंतर पुन्हा ऑगस्टमध्ये (२०१८) पाऊस पडला, मात्र या महिन्याच्या कालावधीत कोरडवाहू शेतकऱ्यांबरोबरच बागायती शेतकऱ्यांना पाणी टंचाईने होरपळले होते. विभागात आजवर झालेला पाऊस अपेक्षित पावसाच्या तुलनेत केवळ ५०.५६ टक्के, तर वार्षिक सरासरीच्या तुलनेत कवेळ ३१.५ टक्के एवढा झाला होता.[१३]


अ) मराठवाडयातील शेतकरी आत्महत्या १४

तक्ता क्र.१.३

| अ.क्र | वर्ष | एकूण आत्महत्या |
|---|---|---|
| १ | २०१० | १९१ |
| २ | २०११ | १६९ |
| ३ | २०१२ | १९८ |
| ४ | २०१३ | २०७ |
| ५ | २०१४ | ५७४ |
| ६ | २०१५ | १,१३३ |
| ७ | २०१६ | १,०५४ |
| ८ | २०१७ | ९६० |
| ९ | २०१८ | ६७४ |
| | एकूण | |

(स्त्रोत - दैनिक मटा -२४ नोहेबंर २०१८)

मराठवाडयात तब्बल दिड हजारांवर नोंदणीकृत सावकार आहेत. त्यांनी मराठवाडयात गेल्या दोन वर्षात सावकारानी तब्वल १३० कोटी रुपयाहून अधिक कर्जाचे वाटप केले होते त्यांच्याकडून तब्वल १ लाख २० हजार शेतकऱ्यांनी कर्ज घेतले होते. या व्यतीरिक्त खाजगी सावकारांकडून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या भरपूर होती. मात्र त्यांची सरकारी पातळीवर नोंद उपलब्ध नसल्याने सांख्यिकीय माहिती स्पष्ट करता येणार नाही. याबरोबरच जिल्हा बँक आणि इतर राष्ट्रीयकृत बँकेचे कर्ज घेणारे शेतकरी वेगळेच आहेत. हा घेतलेला पैसा फेडायचा कसा, या विवंचनेतून शेतकरी वैफल्यग्रस्त होवून आत्महत्या करत आहेत. मराठवाडयातील शेतकऱ्यांचे नगदी पीक कापूस आहे. मराठवाडयात दरवर्षी ३० ते ३५ लाख हेक्टरवर कापूस उत्पादन घेतले जाते. मात्र हा कापूस परराज्यात जात असल्याने स्थानिक स्तरावरील नागरिकांना रोजगार मिळत नाही. शिवाय मराठवाडा-विदर्भ कापूस उत्पादक प्रदेश असूनही सूतगिरण्या मात्र पश्चिम महाराष्ट्रातच एकवटल्या आहेत.





Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science
PRINCIPAL
Govt. College of Arts & Sci.
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

ब) मराठवाडयातील आत्महत्यांची जिल्हानिहाय सांख्यिकीय स्थिती १५:२६-१२-२०१७

तक्ता क्र.१.४

| अ.क्र. | जिल्हयांचे नाव | एकूण आत्महत्या |
|---|---|---|
| १ | जालना | ९१ |
| २ | नांदेड | १४४ |
| ३ | परभणी | १२३ |
| ४ | औरंगाबाद | १३३ |
| ५ | बीड | १९७ |
| ६ | लातूर | ९३ |
| ७ | हिंगोली | ५५ |
| ८ | उस्मानाबाद | १२४ |
| | एकूण | ९६० |

(स्त्रोत - दैनिक दिव्य मराठी - २८-१२-२०१७)

मराठवाडयात शेतकऱ्यांना शेतीशिवाय इतर कोणतेच उदरनिर्वाहाचे साधन नसल्याने शेतकरी उदरनिर्वाहासाठी इतरत्र भटकतांना दिसतो, तर काही शेतकरी आत्महत्या करण्याचा मार्ग निवडतात. महाराष्ट्र आणि इतर शेजारील राज्यातील वीज दराबाबत मोठी तफावत आहे. आर्थिक गुंतवणूक, रोजगार निर्मिती अशा विविध क्षेत्रांमध्ये आघाडीवर असल्याचा दावा करणारा महाराष्ट्र वीजदरांच्या बाबतीत आघाडीवर आहे. महावितरणाचे औद्योगिक वीज दर हे शेजारील राज्याच्या तुलनेत दीडपट आहेत. जे की शेतकऱ्यांना व सामान्य नागरिकांना परवडणारे नाहीत. त्यामुळे घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिकांवर यांचा अविपरीत परिणाम होतो. सततचे वाढते वीज दराबाबतचे शासन-प्रशासनाचे धोरण व त्यास वैतागलेले शेतकरी आत्महत्येचा मार्ग निवडतात. मराठवाडयात २०१७ ला चांगला पाऊस झाला होता, राज्य सरकारने कर्जमाफीची घोषणा ही केली. तरीही वर्षभरात म्हणजे २६ डिसेंबर २०१७ पर्यंत ९६० शेतक-यानी आत्महत्या केल्या होत्या. २०१६ मध्ये एकूण मराठवाडयात आत्महत्या करणा-या शेतकऱ्यांचे प्रमाण १०५३ होते. त्या तुलनेत यंदाचे प्रमाण कमी असले तरीही शेतकरी आत्महत्याचे दुष्टचक्र काही थांबायला तयार नाही. २०१७ मध्ये बीड जिल्हयात सर्वाधिक १९७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सिंचनाच्या सुविधा असलेल्या परभणी जिल्हयातही आत्महत्यामध्ये वाढ झाली आहे. मराठवाडयात दररोज किमान तीन शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. यंदा पाऊस चांगला पडला. धरणात पाणीसाठाही बऱ्यापैकी आहे. राज्य सरकारने कर्जमाफीची घोषणा केली, तरीही आत्महत्याचे दुष्टचक्र सुरुच आहे. औरंगाबाद जिल्हयात २०१८ या वर्षी १३३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. गेल्या वर्षी हा आकडा १५१ होता. २०१४ मध्ये ५६ तर २०१५ मध्ये १४४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. तसेच बीड जिल्हयात याचे प्रमाण (२०१७-सालचे) सर्वाधिक म्हणजे १९७ आहे. २०१५ मध्ये ३०१, २०१६ मध्ये २२२ आणि २०१४ मध्ये १५४ असे गत तीन ते चार वर्षाचे प्रमाण आहे. नांदेडमध्ये याचे प्रमाण थोडे कमी (१४४) आहे.जाने-सप्टे २०१८ मध्ये मराठवाडयात आत्महत्या करणा-या शेतकऱ्यांचे प्रमाण ६७४ होते.[१५]

क) पंचनामे पूर्ण झालेले जिल्हे-१७

तक्ता क्र. १.३

| अ.क्र | जिल्हा | बाधित क्षेत्र | शेतकरी संख्या | आवश्यक निधि |
|---|---|---|---|---|
| १ | बीड | ३७७६९२ | ६९९१४५ | २५६ कोटी ५१ लाख |
| २ | नांदेड | २६२९२० | ४२३५९९ | १७६ कोटी १२ लाख ६४ हजार |
| ३ | लातूर | २१८७.८५ | ३५३८ | १ कोटी ४९ लाख ४१ हजार |
| ४ | उस्मानाबाद | १४९३०.५४ | २०१५१ | १० कोटी १० लाख ५८ हजार |
| ५ | हिंगोली | ५३९७५.५० | ८५७२३ | २३६ कोटी ६० लाख ४२ हजार |
| ६ | परभणी | २३३०२४ | ३५११९८ | १५७ कोटी ९७ लाख ९२ हजार |

(स्त्रोत दैनिक पुढारी १३ जानेवारी, २०१८)

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी अंतर्मनातून प्रयत्न करावे ही अपेक्षा. तसेच आत्महत्याचा टोकाचा मार्ग शेतकऱ्यांनी निवडू नये, कारण आत्महत्या केल्यानंतर कुटुंबातील इतर सदस्यांच्या भावी जीवनाचा विचार करून अशी भूमिका घेऊ नये. यासाठी सामाजिक चळवळींनी, संघटनांनी तसेच स्वयंसेवी संस्थांनी शेतकऱ्यांचे प्रबोधन करावे व मराठवाडयातील शेतकरी आत्महत्या थांबवाव्यात. उस्मानाबाद जिल्हयात शेतकऱ्यांचे मानसिक धैर्य वाढविण्यासाठी 'पर्याय' या संस्थेच्या माध्यमातून ज्याप्रमाणे उपक्रम राबविले जातात, त्याचप्रमाणे मराठवाडयातील इतरत्र जिल्हयात अशा संस्थांनी उपक्रम राबवावे जेणेकरून शेतकऱ्यांना मानसिक आधार वाटेल.

१.११ निष्कर्ष :

१. जगात सर्वाधिक आत्महत्या या दक्षिणपूर्व आशिया विभागात (दक्षिण पूर्व आशियातील कमी व मध्यम उत्पन्न असलेल्या देशात ३९%) होतात. भारतातील आत्महत्येचा दर हा दर लाख लोकामागे २१.१ टक्के आहे.

२. सततचा दुष्काळ, नापिकी, कर्जबाजारीपणा खासगी सावकारीचा पाश, शेतमालाचे घसरलेले भाव या व अन्य कारणामुळे सध्याच्या सरकारच्या ४ वर्षाच्या काळात महाराष्ट्रात ११ हजार २,४१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, तर आघाडी सरकारच्या १५ वर्षाच्या काळात १७ हजार ७,०३ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली.

३. मराठवाडयात २०१४ मध्ये ५६ तर २०१५ मध्ये १४४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. तसेच बीड

Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science A'bad.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad
Scanned with OKEN Scanner

१०. मराठवाडयातील शेतकऱ्यांचे गावोगावी गट तयार केले जावे, त्यात सरकारी हस्तक्षेप नसावा ज्यामुळे शेतकऱ्यांना एकमेकांचा आधार वाटेल.

११. राज्यातील घरगुती, व्यवसायिक आणि औद्योगिक ग्राहकांवरील वीज दरवाढीचा बोजा कमी करावा व शेतकऱ्यांना अल्पदरात वीज पुरवठा करण्यात यावा.

१२. मराठवाडयातील व महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विशेष कृती धोरण ठरवावे.

१३. शासनाने शेतकऱ्यांच्या उत्पादनांना, पीकांना योग्य तो हमी भाव दयावा.

१४. मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी प्रशासकीय पातळीवर एक खंबीर यंत्रणा उभी करावी.

संदर्भ सूची :

१. पंडित नलावडे, भारतापुढील आव्हाने आणि सद्यस्थिती, २०१५, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. पा.नं-१७
२. शेख फारूक, आर्थिक विकास एक चिंतन,२०१३, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.पा.नं-९८
३. हू, मेंटंल हेल्थ ऑफ सबस्टॅन्स अब्यूज विभाग, संचालक, डॉ.शेखर सक्सेना, २०१४
४. दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दिनांक ६ जाने. २०१७
५. हमीद दाभोळकर, आत्महत्या असंवेदनशीलतेची परिणीती, दैनिक लोकसत्ता १६ जून २०१३.
६. NDA, UPA failed to curb farmer suicides-*". Have India's farm suicides really declined? By P Sainath*"Profile of suicide victims categorized by profession – 2013" (PDF). Archived from the (PDF) on 26 February 2015*. " Farmers commit suicide every day in India: Research".) National Crime Record Bureau Report-1995-2011
७. शंकुतला पाटील (२०१२) 'शेती क्षेत्रातील कर्जबाजारीपणा' संशोधनात्मक लेख.
८. देशमुख नानासाहेब,२०१३, सावकारी संपुष्टात आणणे हाच उपाय, दैनिक दिव्यमराठी, (सोलापूर) २५ जूले, २०१३
९. बडगे मोरेश्वर,२०१३, घटते आहे शेतकऱ्यांची लोकसंख्या, दैनिक लोकमत (सोलापूर), ०९ जूले, २०१३
१०. स्वामीनाथन एम.एस, कृषी क्षेत्राचे पुनरूज्जीवन आणि कृषक समृध्दी संपादित ग्रंथ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या: चिंतन आणि उपाय, संपादक,लांजेवार नरेंद्र, सुमेरू प्रकाशन, डोबिवली (पू), २००७, पृष्ठ क्र,१७-३२
११. P.Sainath 2.National Crime Record Bueruo-2016 3 and Dainik Sakal -21-11-2018
१२. दैनिक मटा , ८-०२-२०१९
१३. दैनिक सकाळ, दुष्काळाच्या खाईत मराठवाडा, ३ डिसेंबर २०१४
१४. दैनिक मटा -२४ नोहेबंर २०१८
१५. दैनिक दिव्य मराठी. २८ डिसेंबर २०१७
१६. दैनिक महाराष्ट्र टाईम्स २४-११-२०१८
१७. दैनिक पुढारी १३ जानेवारी, २०१८

Asst. Prof.
M.E.S.Class -I
Govt.College of Art's
Science A'bad.

Govt. College of Arts & Science * Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad



Scanned with OKEN Scanner